# वेलबुट्टीचा समाजवाद

*बँकांचं पुनर्भांडवलीकरण करण्याची घोषणा उपाय करण्यापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करणारी आहे.*

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी २.११ लाख कोटी रूपयांची पुनर्भांडवलीकरणाची योजना केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २४ ऑक्टोबर रोजी जाहीर केली. या योजनेसाठी निधी उभा करताना १.३५ लाख कोटी रूपये पुनर्भांडवलीकरण रोख्यांमधून उभी राहाणे अपेक्षित आहे, तर उर्वरित ७६ हजार कोटी रूपये अर्थसंकल्पीय वाटपाद्वारे आणि बाजारपेठेतून कर्जाद्वारे उभे केले जाणार आहेत. बँकिंग क्षेत्रातील निष्क्रिय संपत्तीचं साठलेपण आणि निरर्थक पतवाढ यांमुळं काही भागधारकांनी पुनर्भांडवलीकरणाच्या या उपायाचं स्वागत केलं आहे. या घोषणेनंतर विविध बँक साठ्यांच्या इक्विटी किंमतींमध्ये मोठी वाढ झाली. साहजिकपणे सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खाजगी इक्विटी बाजारपेठेतील घटकांनी या घोषणेचं मुक्त मनानं स्वागत केलं आहे.

या पुनर्भांडवलीकरणाचा संदर्भ दोन कळीच्या घडामोडींशी संबंधित आहे. एक, खाजगी क्षेत्रातील बँकांच्या संपत्तीच्या गुणवत्तेचा स्थिर गतीनं ऱ्हास झाला आहे. भारतीय रिझर्व बँकेनं २०१६-१७ सालच्या वार्षिक अहवालात असं नोंदवलं आहे की, मार्च २०१७ला संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये बँकिंग व्यवस्थेची १२.१ टक्के उधारी तणावग्रस्त होती. ही संपत्ती म्हणजे सकल निष्क्रिय संपत्ती आणि पुनर्रचित प्रमाणित उधारी यांची बेरीज असते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना २०१६-१७ या वर्षात निव्वळ तोटाच पदरी पडला. २००९ साली जागतिक वित्तीय संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतातील नियामक संस्थाही भयग्रस्त झाल्या आणि या देशातही असंच संकट आहे असं मानून त्यांनी नियामक संयमाचे उपाय लागू केले, त्या वेळेपासून बँकिंग क्षेत्राचा हा ऱ्हास सुरू झाला आहे. त्यानंतर सरकारी-खाजगी भागीदारीच्या प्रारूपाद्वारे पायाभूत विकासप्रकल्पांना विपुल वित्तपुरवठा करण्यात आला, सार्वजनिक क्षेत्रातील निवडक बँकांना सरकारी वाटप करण्यात आलं, या निष्क्रिय संपत्तीच्या ओझ्यात भर घालण्याचं काम साट्यालोट्याच्या भांडवलशाहीच्या अहवालांनी केलं.

दोन, २०१४-१५ सालापासून बँकांची पतवाढ धिम्या गतीने होते आहे. २०१६-१७ साली या वाढीचा दर ८.२ टक्के इतका कमी होता. सप्टेंबर २०१७पर्यंतच्या आकडेवारीनुसार ही पतवाढ आता एक अंकी टक्केवारीतच राहिली आहे. मुख्य म्हणजे शेती व पूरक व्यवसायांना होणाऱ्या पतपुरवठ्यात तीव्र घट झाली. सप्टेंबर २०१७मध्ये या पतपुरवठ्यात ५.८ टक्क्यांची वाढ झाली. परंतु वर्षभरापूर्वी ही वाढ १५.९ टक्के होती. सेवा क्षेत्रातील पतवाढ सप्टेंबर २०१७मध्ये सात टक्क्यांनी घटली. सप्टेंबर २०१६मध्ये ही वाढ १८.४ टक्के होती. वार्षिक स्तरावर अन्नबाह्य बँक पत सप्टेंबर २०१७मध्ये ६.१ टक्क्यांनी वाढली. गेल्या वर्षी ही वाढ १०.८ टक्के होती.

या दोन घडामोडी एकमेकांशी कितपत संबंधित आहेत? पतवाढीला केवळ निष्क्रिय संपत्तीची उपस्थिती हाच अडथळा आहे का? नॉर्थ ब्लॉक आणि मिंट स्ट्रीट या ठिकाणांवरून कितीही मोठ्या बाता मारल्या जात असल्या, तरी वास्तविक सकल घरेलू उत्पन्नातील

वाढ गेल्या सहा तिमाहींमध्ये घटत चालली आहे. २०१७-१८ सालच्या एप्रिल-जून तिमाहीमध्ये भारताचा आर्थिक विकास ५.७ टक्क्यांपर्यंत खाली आला. गेल्या तीन वर्षांमधील हा सर्वांत नीचांकी दर आहे. निश्चलनीकरणासारखी धोरणं आणि वस्तू व सेवा कराची घाईगडबडीनं केलेली अंमलबजावणी यांमुळे आर्थिक मंदीला हातभारच लागला. अशा प्रकारच्या दुर्बल आर्थिक कृतिशीलतेच्या अर्थव्यवस्थेमध्ये सरकारनिर्मिती रचनात्मक अडथळ्यांची भर पडली आहे, त्यामुळं पतमागणी नसतानाही पुनर्भांडवलीकरण झालेल्या बँकांना गुंतवणुकीच्या चक्राला गती देणे शक्य होईलच असं नाही. अशा वेळी बँकांच्या पुनर्भांडवलीकरणाकडून इतक्या अपेक्षा का ठेवल्या जात आहेत?

पुनर्भांडवलीकरण आणि शेतकी कर्जमाफीचा प्रस्ताव यांच्यात तुलना केल्यावर हा विरोधाभास स्पष्ट होतो. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यास प्रामाणिक पतसंस्कृतीला क्षीण होण्याची शक्यता असते आणि त्यातून खाजगी कर्जदारांचं फावतं, असं आपल्याला आधी सांगण्यात आलं. कर्जबुडव्यांची यादी प्रसिद्ध करण्याच्या बाबतीत सरकारनं प्रचंड अनास्था दाखवल्याचं आपण गतकाळात अनुभवलेलं आहे. बड्या खाजगी कंपन्या कर्ज बुडवत आहेत आणि कर्जपरताव्याची प्रक्रिया अतिशय मंदावलेली आहे, अशा वेळी सरकार कोणता संकेत देऊ पाहातं आहे? सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या पुनर्भांडवलीकरणानं बड्या कर्जदारांकडून होणाऱ्या अशा नैतिक हानीला विश्वासार्हताच प्राप्त होत नाही काय? हा 'वेलबुट्टीचा समाजवादा'चा प्रकार आहे- या धोरणांमध्ये तोट्याचं सामाजिकीकरण केलं जातं आणि नफ्याचं खाजगीकरण केलं जातं (एक प्रकारे ही 'श्रीमंतांसाठी समाजवाद आणि गरीबांसाठी भांडवलशाही' अशा स्वरूपाची रचना असते). शिवाय, त्याच बँका पुनर्भांडवलीकरण झालेले रोखे स्वतःकडं ठेवणार आहेत का? अशा प्रयत्नांनी खाजगी कर्जदारांचं फावणार नाही का? हे सर्व प्रश्न अनुत्तरितच राहिले आहेत.

बँकिंग क्षेत्रातील संकट दूर करण्याबाबतच्या अपेक्षा मंदावल्या आहेत. डिसेंबर २०१६मध्ये नादारी आणि दिवाळखोली नियमावलीला कायदेशीर रूप देण्यात आलं, त्यातून नवीन युग सुरू झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला, परंतु वास्तव निराळंच असल्याचं समोर आलं. पोलाद, ऊर्जा वा दूरसंचार यांसारखी क्षेत्र अजूनही गंभीररित्या तणावग्रस्त आहेत. बँकिंग क्षेत्राच्या बाबतीत २०१७-१८च्या केंद्रीय अर्थसंकल्पानं निस्तेज भूमिका घेतली. मग आता बँकांच्या पुनर्भांडवलीकरणाचा निर्णय का घेतला गेला?

दोन राज्यांमध्ये निवडणुका होऊ घातल्या आहेत आणि आर्थिक आघाडीवर विद्यमान सरकारचं अपयश दृश्यमान झालं आहे, अशा वेळी सगळ्यांच्या तोंडी असलेलं भासमान वित्तीय उत्प्रेरक म्हणजे हा निर्णय आहे की काय? आधीच उधाण आलेल्या साठा किंमती यामुळं आणखी वाढणार आहेत का? प्रचंड गाजावाजा करण्यात आलेल्या 'मोदीनॉमिक्स'चा हा भाग आहे का? बँकांच्या पुनर्रचनेचा कार्यक्रम कुठं आहे? असे सर्व प्रश्न या प्रक्रियेत उपस्थित होतात, आणि पुनर्भांडवलीकरणाची घोषणा उपाय ठरण्याऐवजी नवीन प्रश्न उपस्थित करणारी ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेची ही शोकांतिकाच म्हणायला हवी. ●

---

## भारताचं तेल-दुर्दैव

*तेलाला पर्याय शोधला नाही, तर या तेलावरून भारताचाच पाय घसरून पडण्याची शक्यता आहे.*

भारत हा जगातील कच्च्या तेलाचा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा ग्राहक आहे. जुन्या औद्योगिक

अर्थव्यवस्थांमध्ये कच्च्या तेलाची मागणी मंदावत असताना भारतात मात्र तेलाची मागणी वेगानं वाढते आहे. जागतिक तेल उद्योग पुढील दोन दशकांसाठी भारताकडं सर्वांत महत्त्वाचं निर्यातीचं ठिकाण म्हणून पाहातो आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८० टक्के गरज आयातीवर भागवली जाते. देशांतर्गत तेल उत्पादन घटतं आहे, त्यामुळं भविष्यकाळात कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील लहरी बदलांचा धोका भारताला जास्त जाणवेल. आयात किंमती कमी झाल्यामुळं २०१४ सालच्या मध्यापासूनची गेली तीन वर्षं भारताच्या पथ्यावर पडणारी राहिली, परंतु ही परिस्थिती विपरित दिशेनं बदलते आहे.

२०१३-१४ साली प्रति बॅरल १०५ डॉलर असलेली कच्च्या तेलाची जागतिक किंमत २०१५-१६ साली प्रति बॅरल ४६ डॉलर इतकी खाली आली. आंतरराष्ट्रीय किंमती घटण्याच्या काही महिने आधीच सत्तेत आलेल्या नरेंद्र मोदी सरकारनं कमी किंमतींचा फायदा घेतला आणि जास्त महसूल मिळवण्यासाठी करांमध्ये वाढ केली. त्यामुळं आंतरराष्ट्रीय किंमती कमी झाल्याचा लाभ ग्राहकांपर्यंत पोचला नाही. आयात किंमती प्रति बॅरल १०० डॉलर्सपेक्षा जास्त होत्या, तेव्हाइतकीच किंमत पेट्रोल व डिझेलकरिता किरकोळ ग्राहक नंतरही मोजत होते, असा याचा अर्थ होतो. अर्थात, भारत आयात करत असलेल्या कच्च्या तेलाच्या मिश्रणाची ('इंडियन बास्केट') किंमत ३१ ऑक्टोबरला प्रति बॅरल ५९ डॉलर होती. गेल्या वर्षी ३१ जुलैला ही किंमत प्रति बॅरल ५१.२ डॉलर इतकी होती. या काळात किरकोळ विक्रीसाठीची किंमत जवळपास रोज वाढवली जात होती, त्यानंतर विरोधी पक्षांनी निषेधाचा सूर लावल्यावर सरकारला कर कपात करणं भाग पडलं.

किंमतींमध्ये सुरुवातीला झालेली घट ही मुख्यत्वे जागतिक तेल बाजारपेठेतील मोठ्या बदलांमुळं होती. जगातील सर्वांत मोठा तेल उत्पादक असलेल्या सौदी अरेबियासोबतच इतर ओपेक (ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्सपोर्टिंग कंट्रीज्) सदस्यांचा मोठा प्रभाव या बाजारपेठेवर असतो. २०११ ते २०१४ या काळातील वाढलेल्या तेल किंमतींमुळं गुंतवणूक वाढली आणि अमेरिकेतील शेल तेलाचं (एक अपारंपरिक जीवाश्म इंधन) उत्पादनही वाढलं. शेल तेलाच्या उत्खननासाठी भूमिगत खडकांच्या रचनेतील तडे उघडण्यासाठी तीव्र दबावाखाली द्रव आत सोडलं जातं आणि त्यातून तेल किंवा वायू बाहेर काढला जातो. पूर्वी शेल तेलाच्या उत्खननाची उत्पादन प्रक्रिया अतिशय महाग मानली जात होती, त्यामुळं विशिष्ट किंमतीच्या पातळीखाली हे उत्पादन अव्यवहार्य ठरत असे. २०१४च्या मध्यापासून किंमती मोठ्या प्रमाणात घटत असल्या, तरी किंमतींची घट थांबवण्यासाठी उत्पादन कमी करण्याचा पर्याय ओपेक देशांनी वापरला नाही, कारण अमेरिकेचं शेल तेलाचं उत्पादन तोट्यात जाईल, अशी आशा लावून ते बसले होते. कमी किंमतींचा परिणाम झाला असला तरी सुधारलेली उत्पादन तंत्रज्ञान आणि किंमती वाढेपर्यंत तग धरून राहाण्याची उत्पादकांची क्षमता यांमुळे शेल तेलाचं उत्खनन लवचिकरित्या टिकून राहिलं.

शेवटी, कमी किंमतींचा फटका ओपेक सदस्यांनाच बसला. यातील काही सदस्य देशांचे अर्थसंकल्प तेलातून मिळणाऱ्या महसूलावरच मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. परिणामी २०१६ वर्षाच्या अखेरीला झालेल्या ओपेक करारानं सदस्य-देशांवर उत्पादनाची मर्यादा घातली, जेणेकरून जागतिक अतिरिक्त पुरवठा नियंत्रित व्हावा आणि किंमती वाढाव्यात. तेव्हापासून किंमती स्थिर गतीनं वाढत आल्या आहेत.

तेलाबाबतीत स्त्रोत देशांमध्ये वैविध्य आणण्याचा भारताचा प्रयत्न आहे, कारण आपण आयातीवर अवलंबून आहोत. भारत कच्च्या तेलाची मुख्य आयात ओपेक सदस्यांकडून करत असला तरी, जानेवारी-जुलै २०१७ या काळातील वित्त विभागाच्या

आकडेवारीनुसार असं निदर्शनास येतं की, गेल्या वर्षीच्या या कालावधीमधील तेल आयातीच्या तुलनेत या वर्षी १३ अब्ज ५० कोटी डॉलर्सची (मूल्यामध्ये ४२ टक्के) वाढ झाली, यातील ओपेकबाह्य स्रोतांचा वाटा २ अब्ज ४९ कोटी १० लाख डॉलर्सइतक्या वाढीचा होता (मूल्यामध्ये ६४.८ टक्के वाढ). या वर्षी १ जानेवारीपासून लागू झालेल्या उत्पादनाची मर्यादा आता ओपेकच्या सदस्य देशांना बंधनकारक असल्यामुळं ओपेक बाजारपेठेतील वाटा सोडून देत असल्याची परिस्थिती यातून निर्देशित होत आहे.

या संदर्भात भारताची अमेरिकेकडून होणारी तेल आयात ही एक महत्त्वाची घडामोड आहे. या आयातीची व्याप्ती सध्या महत्त्वाची नाही (ही आयात सध्या खूपच कमी आहे), परंतु वाढत्या शेल तेल उत्पादनामुळं अमेरिका हा जगातील सर्वाधिक वेगानं तेल उत्पादन वाढवणारा देश ठरला आहे. कच्च्या तेलाच्या स्रोतांमध्ये अधिक वैविध्य आल्यास भारताला ओपेक सदस्यांसोबतच्या वाटाघाटींमध्ये सबळ स्थान प्राप्त होईल.

अधिक कार्यक्षमता आणि पर्यायी ऊर्जा स्रोत यांमुळं जागतिक तेलाची गरज कायमस्वरूपी घटेल की काय, अशी भीती जागतिक तेल बाजारपेठांना वाटते आहे, त्यामुळं या घडामोडी महत्त्वाच्या ठरतात. विकसनशील देशांमध्ये, विशेषतः रस्ते वाहतुकीसारख्या क्षेत्रांमध्ये तेलापासून दुसऱ्या इंधनाकडं जाण्यासाठीचा बदल अपेक्षेपेक्षा कमी आहे. तेलावर कमी अवलंबून असलेल्या पर्यायी वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करण्याचं ध्येय भारतानं अंशतः स्वीकारलं आहे. प्रदूषणविरहित सार्वजनिक वाहतुकीमधील वाढती गुंतवणूक किंवा वैयक्तिक वाहतूक साधनांवर मर्यादा घालणं, यांसारख्या कृतींमुळं आपल्या शहरांवरील प्रदूषणाचा बोजा कमी होईल. यातील काही शहरं आधीच जगातील प्रदूषणकारी ठिकाणांच्या यादीत वरच्या स्थानावर आहेत.

भारताची तेलाची वाढती मागणी आणि आयातीवरील अवलंबित्व यांमुळं जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी अधिक तत्काळ व्यूहरचना गरजेची आहे. हे आर्थिक भानासोबतच पर्यावरणीय भान दाखवणारेही ठरेल. आज आपण करत असलेल्या आर्थिक निवडी केवळ भविष्यातील पिढ्यांच्या जीवनमानावर प्रभाव पाडणाऱ्या नाहीत, तर आपल्या पिढीवरही त्याचा प्रभाव पडत असतो.

●

---

## सर्वोच्च न्यायालयाचा स्वागतार्ह निर्णय

***कैद्यांना सुधारण्याची व पुनर्वसनाची संधी देणं ही गुन्हे न्यायव्यवस्थेची जबाबदारी असते.***

तुरुंगात असताना 'अनैसर्गिक मृत्यू' झालेल्या कैद्यांच्या कुटुंबीयांना शोधून त्यांना नुकसानभरपाई द्यावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयानं १५ सप्टेंबर २०१७ रोजी दिला. तुरुंगांच्या अवस्थेविषयी अलीकडच्या वर्षांमध्ये देण्यात आलेला हा सर्वांत प्रगतीशील निकाल आहे. तुरुंगात होणाऱ्या मृत्यूंचं गांभीर्य न्यायालयानं लक्षात घेतलं आणि सरकारनं आत्तापर्यंत याबाबतीत केवळ वेळ मारून नेणारी निष्काळजी पावलं उचलली आहेत, याचीही दखल घेतली. त्यानुसार या प्रश्नावर प्रत्येक उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी स्वतःहून जनहित याचिका दाखल करावी, अशी विनंती सर्वोच्च न्यायालयानं केली होती. या संदर्भात आता देण्यात आलेल्या निकालामध्ये तुरुंगातील अनैसर्गिक मृत्यूंना प्रतिबंध, भेटीचे अधिकार, कायदेशीर व आरोग्यसेवा, आदर्श तुरुंग हस्तपुस्तिकेची अंमलबजावणी, तुरुंग कर्मचाऱ्यांची जाणीवजागृती यांसाठीच्या शिफारसी

करण्यात आल्या आहेत. शिवाय, खुल्या तुरुंगांचंही समर्थन यात करण्यात आलं आहे.

तुरुंगातील मृत्यू ही केवळ तुरुंगप्रशासनाशी संबंधित समस्या आहे, या विचाराला या निकालानं अमान्य केलं, हे याचं लक्षणीय वैशिष्ट्य म्हणावं लागेल. सुधारणा आणि पुनर्वसन ही आदर्श तत्त्वं नाकारण्यातून हे मृत्यू होतात, अशी योग्य संदर्भचौकट न्यायालयानं या निकालाद्वारे दिली आहे. आपली गुन्हा न्यायव्यवस्था शिक्षा आणि अडथळा असा विचार अंगिकारते. कैदी हा शिक्षा देण्या'लायक'च आहे, असं मानून तुरुंगात केले जाणारे अत्याचार आणि परिणामतः कैद्यांचा मृत्यू होण्याच्या घटना या विचाराचं सूचन करतात.

या ताज्या निकालामुळं कैद्यांच्या अवस्थेविषयीची चर्चा पुनरुज्जीवित झाली असली, तरी दुर्दैवानं गतकाळात सर्वोच्च न्यायालयाचे तुरुंग सुधारणांविषयीचे आदेश बासनात गुंडाळून पडलेले आहेत. एखाद्या गुन्ह्यातील आरोपीनं त्या गुन्ह्यासाठीच्या कमाल निर्धारीत तुरुंगवासाच्या कालावधीपैकी अर्धा काळ तुरुंगात घालवला असेल, तर त्याला मुक्त करावं, असा आदेश न्यायालयानं एप्रिल २०१५मध्ये दिला होता. परंतु या आदेशाचं पालन न झाल्यामुळं सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाला १० ऑक्टोबर २०१७ रोजी पुन्हा आदेश द्यावे लागले आणि महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांना प्रतिसाद देण्यासाठी कार्यमर्यादा घालून द्यावी लागली.

गुन्हेगार म्हणजे गुन्हेगारी कायद्याचा भंग केलेली व्यक्ती, अशी व्याख्या करण्यात आलेली असली तरी गुन्हेगारीच्या सीमा अचल नसतात हा विचार आता अधिकाधिक स्वीकारला जातो आहे. वर्ग आणि सत्ता यांची भूमिका, त्याचसोबत समाजातील प्रशासकांनी लागू केलेले सामाजिक नियम यांचा प्रभाव गुन्हेगारी कायद्याच्या व्याप्तीवर होत असतो. त्यामुळं तुरुंगात विशिष्ट वंचित गटांमधील लोक अवाजवी प्रमाणात भरलेले असतात, हे साहजिकच आहे. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या असहाय्य असलेल्या समाजघटकांना व्यवस्थांतर्गत अन्याय अधिक सहन करावा लागतो, असं राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होतं. तुरुंगातील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मुस्लीम या समाजघटकांमधील आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येतील या घटकांच्या टक्केवारीपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. आर्थिक व सामाजिक भांडवलाच्या अभावामुळं गुन्हे न्यायव्यवस्थेला सामोरं जाण्यात हे घटक अपयशी ठरतात, त्यातूनही या तफावतीला पूरकता मिळते.

कैद्यांबाबतचे असे अंगभूत पूर्वग्रह व चुकीचे दृष्टिकोन आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी तुरुंगांच्या भिंतीआडही पसरत असतात आणि टिकून राहातात. तुरुंगातील अत्याचार व मृत्यू, त्याचसोबत प्राथमिक मानवाधिकार व प्रतिष्ठा यांबाबत कैद्यांना सहन करावी लागणारी वंचना, हे सर्व या पूर्वग्रहांमधूनच येतं. सुधारणात्मक व पुनर्वसनविषयक आदर्श तत्त्वं राबवली नाहीत, तर तुरुंग म्हणजे वंचनेची यंत्रणा ठरते. कारावासामुळं व्यक्ती, कुटुंब आणि समुदायाच्या पारंपरिक आधारव्यवस्थांपासून आणखी दुरावते. या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर, ही व्यवस्था सोडणाऱ्या व्यक्तीचं काय होतं, याचा विचार आपण करायला हवा. पुनर्वसन प्रक्रियेकडून अशा व्यक्ती काय अपेक्षा ठेवू शकतात?

शिक्षा झालेल्या कैद्यांना प्रोबेशन व पेरोल यांच्यासारख्या कायदेशीर सुविधा उपलब्ध असतात, परंतु त्यांचा पुरेसा वापर केला जात नाही, त्याचप्रमाणे पुनर्वसन प्राधान्यावर नसतं. साध्य होण्याजोग्या सुधारणाविषयक ध्येयांचं आकलन करून घेण्यासाठी परदेशांमधील प्रयोगांकडं पाहायला हवं. बहुतांश स्कॅन्डिनेव्हियन देशांनी तुरुंगविषयक सुधारणांची पथदर्शी प्रारूपं उभारली आहे. परंतु इतकं दूरही जायची गरज नाही. डॉमिनिकन रिपब्लिकसारख्या लहानशा बेटरूपी

राष्ट्रातही अशा सुधारणांबाबत अतिशय परिणामकारक उपक्रम राबवले जात आहेत. त्यामुळं या देशात वारंवार गुन्हे करण्याचं प्रमाणही लक्षणीयरित्या कमी झालं आहे. तुरुंगात नागरी जीवनातून कर्मचाऱ्यांची भरती करणं (त्यामुळं सुधारणा संस्थांचा पोलीस व सैन्याशी संबंध तोडला जातो), कोठडीत घालवावा लागणारा वेळ एकदम कमी करणं, प्रत्येक कैद्याला साक्षरता अनिवार्य करणं, असे संस्थात्मक बदल या देशात राबवण्यात आले. ही पावलं परिणामकेंद्री आहेत आणि भारतीय संदर्भातही ती सहज अनुसरता येण्यासारखी आहेत.

तुरुंगातील कर्मचारी व नागरी समाज यांची जाणीवजागृती करावी, आणि तुरुंगात समुपदेशक व बिगरसरकारी संस्थांचा वावर वाढवावा, असं आवाहन सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामध्ये करण्यात आलं आहे. हे घटक पुनर्वसन प्रक्रियेतील महत्त्वाच्या स्थानी असतात, मुक्त झालेल्या कैद्याला समाजात पुन्हा प्रवेश करणं सुकर जावं, यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची असते. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला प्रतिसाद देत दिल्ली, मुंबई, मद्रास आणि जम्मू-काश्मीर इथल्या उच्च न्यायालयांनी, आणि इतरही न्यायालयांनी तुरुंगातील मृत्यूसंदर्भात नुकसानभरपाई देण्यासाठी गेल्या महिन्यात स्वतःहून सुनावण्या सुरू केल्या आहेत. परंतु केवळ न्यायालयांची क्षमता आणि राज्यांचा प्रतिसाद एवढ्याच बळावर असे प्रयत्न तारून नेणं, पुरेसं नाही. किंबहुना गुन्हे न्यायव्यवस्थेच्या वास्तवांशी ते सुसंगत नसेल, तर ते विपरित परिणाम करणारं ठरू शकतं. त्यामुळं तुरुंगविषयक सुधारणांबाबतच्या चर्चेत या प्रक्रियेतील महत्त्वाचे सहभागी घटक असलेले कैदीही समाविष्ट करून घ्यायला हवेत.

तुरुंगातील सुधारणा म्हणजे केवळ गजांआड होणारा हिंसाचार थांबवणं, असा मर्यादित अर्थ घेतला जाऊ नये. समाजातील विशिष्ट घटकांच्या विरोधातील दंडाचं संस्थाकरण करण्यामध्ये तुरुंगांनी पार पाडलेली मुख्य भूमिका लक्षात घ्यायला हवी आणि सुधारणाविषयक उपक्रमांना या आकलनाची जोड दिली जावी. खुल्या तुरुंगांसारख्या संकल्पनांवर आणखी संशोधन करण्याची शिफारस न्यायालयानं केली आहे, यातून तुरुंगसंस्थांच्या पारंपरिक कल्पनेपासून नवी चर्चेची वाट न्यायालयानं, बहुधा अभावितपणे, दाखवली आहे. अशा परिस्थितीत तुरुंग सुधारणा चळवळ म्हणजे 'कैद्यांना मुक्त करण्यासाठी'चा उदात्त प्रयत्न आहे, असला समज चुकीचा आहे. उलट, अप्रतिष्ठा, भेदभाव आणि मृत्यू यांपासून कैद्यांना मुक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. ●

---

## मनोहर पर्रिकरांचं लोकविरोधी पाऊल

*गोवा राज्यातील पर्यावरणविषयक खटले राष्ट्रीय हरित लवादाच्या पुण्यातील पश्चिम खंडपिठाच्या न्यायक्षेत्रातून दिल्लीत हलवणे अयोग्य पाऊल.*

शाश्वत पर्यावरणाच्या संकल्पनेची काहीच फिकीर न करणाऱ्या 'विकास'योजना रेटून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्य सरकारांच्या मार्गामध्ये गोव्यातील सक्रिय पर्यावरणीय गट अडथळा ठरत होते. त्यामुळं गोव्याशी संबंधित सर्व पर्यावरणविषयक खटले राष्ट्रीय हरित लवादाच्या पुण्यातील पश्चिम खंडपिठाच्या न्यायक्षेत्राबाहेर दिल्लीत हलवण्याचा विद्यमान मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचा निर्णय आश्चर्यकारक वाटत नाही. पुण्याला जाण्याचे मार्ग सुकर नाहीत, आणि त्या तुलनेत दूर असलेलं दिल्ली अधिक सोयीचं आहे, असा हास्यास्पद युक्तिवाद गोव्यातील भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) सरकारनं केला आहे. अशा खटल्यांमधील मुख्य याचिकाकर्ते असलेल्या गोव्यातील नागरिकांशी किंवा कोणत्याही संबंधित घटकांशी चर्चा न करता

केवळ दोन महिन्यांमध्ये केंद्रीय पर्यापरण, वन व हवामानबदल मंत्रालयानं हा निर्णयाला दुजोरा दिला, हे मात्र आश्‍चर्यकारक आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पणजी खंडपिठानं दिलेल्या एका अनुकरणीय आणि अनेक अर्थांनी काव्यात्मक निकालामध्ये केंद्रीय मंत्रालयाच्या या सूचनापत्राला 'मनमानी' संबोधलं आहे.

न्यायमूर्ती गौतम पटेल व नूतन सरदेसाई यांचं हे ४७ पानी निकालपत्र तुलनेनं साध्या प्रकरणाविषयी असलं, तरी या देशातील न्यायदानाच्या प्रक्रियेवर व्यापक परिणाम करणारे प्रश्न या निकालातून उपस्थित होतात. राज्यघटनेतील अनुच्छेद २१ अनुसार जीवनाच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारामध्ये 'न्यायाची उपलब्धता' या घटकाचाही समावेश होतो, हा महत्त्वाचा मुद्दा न्यायाधिशांनी या निकालपत्रात नोंदवला आहे. त्यामुळं न्याय उपलब्धतेच्या मार्गात अडथळा निर्माण करणारी कृती या मूलभूत अधिकाराचा भंग करणारी ठरते. न्यायाधीश लिहितात : याचिकाकर्त्यांची कमी गैरसोय व्हावी आणि त्यांना कमी कष्ट पडावेत, यासाठी शाखा वाढवण्याचा विचार न्यायालयं सध्या करत आहेत. अशा वेळी कोणत्याही सरकारनं स्वतःच्या गैरसोयीचं किंवा सोयीचं कारण देऊन एखादा लवाद हजारो किलोमीटर दूर हलवावा, आणि हे व्यापक जनहितासाठीच केल्याचा दावा करावा, हे आम्हाला अतिशय असाधारण वाटतं. हे व्यापक जनहिताचं नक्कीच नाही.

शिवाय, राज्यातील पर्यावरणविषयक खटले दिल्लीतील खंडपिठाकडं वळवण्याचे गोवा सरकारचे प्रयत्न राष्ट्रीय हरित लवादाच्या मूलभूत स्वरूपालाही छेद देणारे आहेत. याचिकाकर्त्यांना न्यायालयात पोचण्यासाठी दीर्घ अंतर कापावं लागू नये- वारंवार दिल्लीला यावं लागू नये- यासाठी हरित लवादाच्या स्थापनेवेळी २०११ साली पाच प्रादेशिक खंडपिठं सुरू करण्यात आली होती. न्यायालयांमध्ये 'पर्यावरणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर' मोठ्या प्रमाणावर नागरी खटले दाखल होत आहेत, त्यांना प्रतिसाद देण्यासाठी राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना करण्यात आली. शिवाय, प्रादेशिक खंडपिठांसोबतच मोठ्या संख्येनं पर्यावरणीय खटले दाखल होणाऱ्या गोव्यासारख्या ठिकाणी चक्राकार खंडपिठंही स्थापन करण्याचा युक्तिवाद हिरीरीनं केला जातो आहे. उदाहरणार्थ, राष्ट्रीय हरित लवादाच्या पश्चिम खंडपिठापुढं सध्या गोव्यातून आलेले १४६ खटले आहेत; त्या तुलनेत महाराष्ट्र व गुजरात यांचे एकत्रित खटले ३४० आहेत. अशा वेळी याचिकाकर्त्यांची सोय वाढवण्याऐवजी गोवा सरकारनं, बहुधा जाणीवपूर्वक, याचिकाकर्त्यांच्या अडचणी वाढवल्या आहेत. पर्यावरणीय याचिकांच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचा इतका धडधडीत प्रयत्न यशस्वी होईल, असा विचार पर्रीकर सरकारनं कसा काय केला, हे आश्‍चर्याचं वाटतं. कारण, गोव्यात डझनभर सक्रिय पर्यावरणीय गट आहेत आणि राज्याच्या नाजूक व दुर्मीळ पर्यावरणावर विपरित परिणाम करणाऱ्या कोणत्याही धोरणाची वा योजनेची कुणकुण लागली की ते तीव्र कृतिशील होतात.

न्यायमूर्ती पटेल व सरदेसाई यांनी मान्य केल्यानुसार 'पर्यावरण व परिसंस्था' ही गोव्याची सर्वांत मोठी संपत्ती आहे. केवळ चौदा लाख लोकसंख्या असलेलं गोवा हे भारतातील बहुधा सर्वाधिक पर्यावरणीय जागरूक राज्य आहे. उच्च साक्षरता दर, स्थानिक शासनाची सक्रिय व्यवस्था, यांमुळं पर्यावरणरक्षणाची लढाई गाव पातळीवर रोजच्यारोज लढली जाते. विकासयोजनांसमोर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून सक्रियरित्या प्रश्न उपस्थित करण्याचं काम पंचायती करतात. त्यांच्या प्रश्नांवर आत्तापर्यंतच्या बहुतांश सरकारांनी तोडगा काढलेला नाही, हा निराळा भाग झाला. वाजवी चर्चा आणि प्रयत्न सरकारला जागं करण्यासाठी पुरेसे ठरत नाहीत, असं लक्षात आल्यावरच नागरिक न्यायालयांमध्ये

जातात. त्यामुळं राष्ट्रीय हरित लवादाचं स्वागत करण्यात आलं होतं, कारण केवळ पर्यावरणीय प्रकरणांचीच सुनावणी घेणारं हे विशेष न्यायालय आहे आणि त्याची प्रादेशिक खंडपिठं असल्यामुळं न्यायाच्या उपलब्धततेमध्येही सुकरता आणण्याचा प्रयत्न यात होता.

न्यायदानाच्या उपलब्धतेचा प्रश्न केवळ न्यायालयांच्या प्रत्यक्ष ठिकाणाशी संबंधित नाही, तर न्यायव्यवस्थेचं शासन करणाऱ्या व्यवस्थेचा हा प्रश्न आहे. न्यायालयं सहज पोचण्याजोगी असली तरी ती बहुतांश नागरिकांच्या आवाक्याबाहेर राहातात, कारण सुनावणी घेण्याची पद्धत अस्पष्ट असते, त्याचा खर्च भरमसाठ येतो आणि खटल्यात दीर्घ विलंब होतो. न्यायदानाच्या उपलब्धतेला या निकालपत्रानं मूलभूत अधिकार मानल्यामुळं देशातील न्यायव्यवस्थेच्या कामकाजाकडं लक्ष देण्याची तातडीची गरज अधोरेखित झाली आहे. न्यायाधिशांनी या निकालपत्रात जेम्स बाल्डविन यांच्या 'द प्राइस ऑफ द टिकट' या पुस्तकातील एक अवतरण दिलं आहे, ते असं : या देशातील न्यायाचं शासन कसं होतं, हे खरोखर समजून घ्यायची कोणाची इच्छा असेल तर त्यानं पोलीस, वकील, न्यायाधीश किंवा मध्यमवर्गातील बचावात्मक सदस्यांकडं विचारणा करून उपयोग नाही. त्यानं असुरक्षित असलेल्यांकडं- म्हणजे ज्यांना कायद्याच्या संरक्षणाची सर्वाधिक गरज असते त्यांच्याकडं जायला हवं, त्यांची जबानी घ्यायला हवी. हा भारताला चोख लागू होणारा संदेश आहे, कारण भारतात 'असुरक्षितां'चं संरक्षण करण्यात कायदे वारंवार अपयशी ठरतात.●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२८ ऑक्टोबर व ४ नोव्हेंबर या अंकांतून)

परिवर्तनाचा वाटसरू
**प्रतिनिधी**

**अकोला शहर –** प्रा. अशोक इंगळे भ्र. ९४२१७४७४१७

**अकोला जिल्हा –** प्रा. संतोष कायंदे भ्र. ९४२१७४८७८२

**लातूर –** राहूल लोंढे भ्र. ७३८५५२१३३६, महेश गुंड भ्र. ९७३०१००४८३

**नांदेड शहर –** प्रा. राजेंद्र गोणारकर भ्र. ९८९०६१९२७४

**परभणी शहर –** प्रा. प्रशांत मेणे भ्र. ९४२१३९२१३०, प्रा. संजय मोहाडे भ्र. ९४०५५९३४७२

**परभणी जिल्हा –** प्रा. सुरेश शेळके ९४२२८७८७०६ । बाळू बुधवंत भ्र. ९४२१८६०८०७, ९९२२२९८४८८

**सातारा –** नितीन साळुंखे भ्र. ९९७५६७०६१२

**सोलापूर –** रवींद्र मोकाशी भ्र. ९४२२६४५०५५

**वाशिम –** शेषराव पिराजी धांडे भ्र. ९९२३४८९६९७

आणि

**औरंगाबाद विस्तार समिती –** डॉ. भारत गोरे भ्र. ९४२२४७८००० । प्रा. वीरा राठोड, भ्र. ८८८८२२८३३५ । । डॉ. शेख इकबाल मिन्ने भ्र. ७०४०७९११३७ । शर्मिष्ठा भोसले भ्र. ९१५८७४२४९१ । प्रा. नवनाथ गोरे भ्र. ९४२३१८१९५७ । सुभाष महेर भ्र. ९४२२७१४५३२ । इनायत परदेशी भ्र. ९८८१८०८०४३ ।

**समन्वयक** : बुद्धप्रिय कबीर ९३७२७२०००१